# दहिसरमध्ये कोव्हीड केअर केंद्र

## मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा उभारणीसाठी सहभाग

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

दहिसर (पश्चिम) येथील कांदरपाडा कोव्हीड केअर केंद्र मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसादिनी सोमवारी (दि.२७) पासून सुरू करण्यात आले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पुढाकाराने हे केंद्र उभारण्यात आले आहे. याप्रसंगी शिवसेना उपनेते, म्हाडा सभापती विनोद घोसाळकर, विभागप्रमुख आमदार विलास पोतनीस, महिला विभागसंघटक सुजाता शिंगाडे, मुंबई बँक संचालक माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर, उपविभाग प्रमुख विनायक सामंत उपस्थित होते.

यावेळी घोसाळकर यांनी उपकरणांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कोव्हीड केअर केंद्र सुरू झाल्याने पश्चिम उपनगरांतील रुग्णांना सोयीचे ठरणार आहे. पश्चिम उपनगरांतील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन याठिकाणी कोव्हीड केंद्र सुरू करण्याची मागणी घोसाळकर यांनी केली होती.



त्यानुसार, कांदरपाडा येथे हे अद्ययावत केंद्र सुरू करण्यात आले आहे. याठिकाणी १०८ अतिदक्षता विभागात बेडची सुविधा उपलब्ध आहे. तसेच याठिकाणी डायलिसिस सुविधा उपलब्ध असल्याने रुग्णांवर एकाच ठिकाणी सर्व उपचार होणार आहेत. यावेळी शिवसेना नगरसेविका तेजस्वी घोसाळकर व नागरिकांनी मुख्यमंत्री व प्रशासनाचे आभार व्यक्त केले.